बैठकीचे इतिवृत्त

दिनांक - २०/०९/२०२४

दिनांक २३/०९/२०२४ रोजी दुपारी १३.३० वाजता शासन परिपत्रक क्र डीपीपी २०१५ /प्रक्र /५०/पोल १० दिनांक १७/१०/२०१५ नुसार पोलीस उप आयुक्त ( प्रकटीकरण ) गुन्हे शाखा.गु.अ.वि. मुंबई यांच्या अध्यक्षते खाली गठीत समितीची नियोजीत बैठक अध्यक्षांच्या दालनात पार पडली.

सदर बैठकीस खालील सदस्य हजर होते.

१) श्री.मिलिंद काठे, पोलीस निरीक्षक, गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक, मुंबई.......... सदस्य
२) सौ. पूजा ढोक, विधी अधिकारी, मुंबई............................................ सदस्य

शासन परिपत्रक क २०१५/प्र.क ५१/पोल १० दिनांक १७/१०/२०१५ मधील शासनाच्या सुचने प्रमाणे न्यायालयीन प्रकरणाचा निकाल तपासी यंत्रणा अथवा अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्या विरुध्द गेला असल्यास त्या संदर्भात दिनांक २३/०९/२०२४ रोजी दुपारी १३.३० वा. खालील गुन्हयातील आरोपी निर्दोष सुटल्याने बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये माहे एप्रिल २०२४ ते जून २०२४ या कालावधीतील आरोपी निर्दोष सुटलेल्या गुन्हयाचा आढावा घेण्यात आला.

सदर बाबत कक्ष १ ते ५, मालमत्ता कक्ष, खंडणी विरोधी पथक व गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक या कक्षांचा माहे एप्रिल २०२४ ते जून २०२४ या कालावधीतील अहवाल मागविण्यात आले होते. सदर प्राप्त अहवाला मधील कक्ष - २ आणि खंडणी विरोधी पथकाकडून निकाली खटल्यांच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात आली. शासन परिपत्रकातील प्रपत्राप्रमाणे अहवाल सोबत जोडण्यात आला आहे.

सदर चर्चा करुन दुपारी १३.४५ वाजता बैठक संपविण्यात आली.

(पूजा ढोक)
विधी अधिकारी

23/9/2024
( मिलिंद काठे)
पोलीस निरीक्षक,
गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक,
गुन्हे शाखा. मुंबई

(दत्ता नलावडे)
पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण)
गुन्हे शाखा. मुंबई

Scanned with CamScanner

( शासन परिपत्रक ,गृह विभाग, क्र डीपीपी-२०१५ /प्र.क्र ५१/पोल १०, दिनांक २६ फेब्रुवारी २०१९ सोबतचे प्रपत्र )

आयुक्तालय / पोलीस अधिक्षक कार्यालय :- पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) गुन्हे शाखा, मुंबई

समितीच्या बैठकीचा दिनांक :- / /

## माहे एप्रिल -२०२४ ते जून २०२४ पर्यंतचा अहवाल

| अ. क्र. | कक्ष | प्रकरण क्रमांक/ मा.न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरुप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक व न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णया नुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांचे नांव, त्यांच्याविरुध्द केलेली/प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | खंडणी विरोधी पथक | एम.सी.ओ.सी. स्पेशल केस क्र. २२/२०१९ | गु.प्र.शा.,गुर.क्र. ६०/२०१९ कलम ३८७, १२० (ब) भा.द.वि. सह कलम ३ (१) (ii), ३(२), ३(४) मोक्का कायदा १९९९<br><br>दाखल दि. १५/०७/२०१९ रोजी २२.३० वा.<br><br>सपोनि सुशीलकुमार वंजारी<br>पो.नि. अजय सावंत<br>सपोआ संजय वेरणेकर / डी विशेष, गु.प्र.शा.,गु.अ. वि., मुंबई | दोषारोप पत्र दाखल दि. १९/१०/२०१९<br><br>न्यायनिर्णय दिनांक १२/०४/२०२४ | १. आरोपींविरोधात कुठल्याही प्रकारचा डायरेक्ट किंवा सबळ पुरावा सरकारी पक्ष सादर करु शकले नाहीत.<br><br>२. साक्षीदार क्र. ८ याने उलटतपासणीमध्ये प्रथम खबरी अहवालामध्ये नमुद प्रमाणे साक्ष न देता विरोधाभासी साक्ष दिली.<br><br>३. साक्षीदार क्र. ८ याचे साक्षीवरुन आरोपींनी कट रचल्याचे सिध्द झाले नाही.<br><br>४. आरोपींमधील संबध सिध्द झाले नाहीत. साक्षीदार क्र. ८ याचा मुलगा ओसामा याची सरकारी पक्षातर्फे तपासणी घेण्यात आली नाही.<br><br>५. साक्षीदार क्र. ६, १०, १५ यांचेसह साक्षीदार क्र. २१ हा गुन्हयातील बळीत असूनही फित्तूर झाले. तसेच साक्षीदार क्र. २१ याने तपासी अधिकारी यांचेसमक्ष दिलेला जवाब मागे घेतला.<br><br>६. साक्षीदार क्र. ६, ८, १० यांचे तोंडी पुराव्यावरुन आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द झाला नाही. तसेच त्याचप्रमाणे आरोपींनी खंडणी मागीतल्याचे सिध्द झाले नाही. | निरंक | निरंक | निरंक |

Scanned with CamScanner

| अ. क्र. | कक्ष | प्रकरण कमांक/ मा.न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरुप (गुन्ह्य नोंद कमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक व न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णया नुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांचे नांव, त्यांच्याविरुध्द केलेली/प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ७. गुन्हा दाखल करण्याकरीता कायदेशिर प्रक्रियेचा (कलम १५७ फौ.दं. प्र.सं.) अवलंब करण्यात आला नाही.<br>८. तपासी यंत्रणेकडून विचाराअंती आरोपींना गुन्हयात अडकविल्याची शक्यता नाकारता येत नाही. तपासी अधिकारी यांनी सादर केलेला पुरावा विश्वासार्ह नसून संशयास्पद असल्याचे न्यायालयाने निरीक्षण नोदंविले.<br>९. साक्षीदार क्र. ९ ची साक्ष विश्वासार्ह नाही.<br>१०. सीडीआर / एसडीआर, कॅफ हे पुष्टीकारक पुरावे आहेत, परंतु प्रत्यक्ष साक्षीदाराच्या पुराव्याअभावी निर्णायक पुरावा मानता येणार नाही. गुन्हा सिध्द करणारे ठोस पुरावे रेकॉर्डवर नाहीत.<br>११. आरोपी क्र. ३ च्या कबुली जबाबा व्यतिरीक्त इतर ठोस पुरावे उपलब्ध नाहीत. आरोपी क्र. ३ याने न्यायालया समोर दिलेला जबाब मागे घेतला. कबुली जबाब कलम १८ प्रमाणे नोंद नाही.<br>१२. पूर्व मंजूरी आदेशाप्रमाणे कलम ३८३ भा.दं.वि. च्या व्याख्येनूसार आरोपी विरुध्द खंडणीचा गुन्हा सिध्द होत नाही.<br>१३. पोलीस आयुक्त यांचे मंजूरी आदेश वैद्य असल्याचे आढळून आले नाही. त्यावरुन आरोपीविरुध्द खंडणीचा गुन्हा सिध्द होत नाही. | | | |

Scanned with CamScanner

| अ. क्र. | कक्ष | प्रकरण क्रमांक/ मा.न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरुप (गुन्हा नोंद कमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक व न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णया नुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांचे नांव, त्यांच्याविरुध्द केलेली/प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | खंडणी विरोधी पथक | कोर्ट केस क्रमांक ४६३/पीडब्ल्यु/ ०४ | गु.प्र.शा.गु.र.क्र. १११/०४ कलम ३८७,३४ भादवि<br><br>पो.उप.नि. कुलकर्णी | दोषारोप पत्र दाखल दि. २२/११/२००४<br><br>न्यायनिर्णय दिनांक ०४/०१/२०२४ | १. प्रथम खबरी अहवालातील फॉर्म क्र. 'सी' वर माहिती देणाऱ्याची स्वाक्षरी नाही.<br>२. तपासी अधिकारी यांनी आरोप असलेल्या आंतरराष्ट्रीय फोनचे सीडीआर प्राप्त केले नाहीत.<br>३. आरोपीच्या घरातून जप्त करण्यात आलेल्या कागदपत्रांवरील हस्ताक्षर पडताळणी करण्याकरीता आवश्यक असणाऱ्या आरोपीच्या हस्ताक्षराचे नमुने घेण्यात आले नाहीत.<br>४. मेमोरंडम व जप्ती पंचनाम्यावर आरोपीच्या सह्या नाहीत.<br>५. पंच साक्षीदार सरकारी पक्षाने तपासले नाहीत.<br>६. आरोपी नासीर याच्या मोबाईलचे सीडीआर मिळविले नाहीत.<br>७. घटनास्थळ शबरी हॉटेल येथील कर्मचारी यांचे जबाब नोंदविण्यात आले नाहीत.<br>८. स्वतंत्र साक्षीदार नाहीत.<br>९. आरोपींचा सहभाग सिध्द करण्यासाठी तांत्रिक पुराव्यांचा अभाव. | निरंक | निरंक | निरंक |

Scanned with CamScanner

| अ. क्र. | कक्ष | प्रकरण क्रमांक/ मा.न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरुप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक व न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णया नुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांचे नांव, त्यांच्याविरुध्द केलेली/प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | कक्ष -२ | कोर्ट केस क्रमांक २४३/पीडब्ल्यु /२००९ | गु.प्र.शा. वि.स्था. गु.र.क्र. ३७/२००८, कलम ३,२५ भाहका सह १३५ मुपोका (पायधुनी पोलीस ठाणे वि.स्था गु.र. क्र. २९/२००८)<br><br>पोउनि शिंदे | दोषारोप पत्र दाखल दि. १३/०३/२००९<br><br>न्यायनिर्णय दिनांक ०२/०५/२०२४ | १. गुन्हयामध्ये सराईत पंच घेण्यात आले आहेत.<br>२. जप्त मुद्देमालाबाबत फिर्यादी व तपासी अधिकारी यांनी केलेल्या वर्णनामध्ये तफावत आहे.<br>३. गुन्हयाच्या ठिकाणी आरोपीच्या येण्याच्या वेळेबाबत साक्षीदारांच्या नोंदीमध्ये तफावत<br>४. आरोपीच्या अटकेचा पंचनामा नाही.<br>५. घटनांचा क्रम नैसर्गिक दिसत नाही आणि त्यामुळे खटल्याच्या कथेत शंका निर्माण होते<br>६. घटना घडल्यानंतर २ तास ५० मिनिटांनी गुन्हा दाखल केला. गुन्हा नोंद करण्यास विलंब.<br>७. जप्त केलेले मॅगझीन आरोपीकडून जप्त केलेबाबत शंका निर्माण करते.<br>८. तपासी अधिकारी यांनी आरोपीकडून जप्त केलेल्या शस्त्रास्त्रांचे चुकीचे वर्णन<br>९. स्वतंत्र साक्षीदारांचे जाबाब नोंदवले नाही. केवळ इच्छुक साक्षीदारांचे जबाब नोंदविले.<br>१०. (Proclamation) आदेश रेकॉर्डवर सादर केलेला नाही<br>११. promulgation order not proved by prosecution | निरंक | निरंक | निरंक |

Scanned with CamScanner

| क्र. | | प्रकरण क्रमांक/ मा.न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरुप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक व न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णया नुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांचे नांव, त्यांच्याविरुध्द केलेली/प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | कक्ष -२ | कोर्ट केस क्रमांक ४०४/पीडब्ल्यु/ २००८ | गु.प्र.शा. वि.स्था. गु.र.क्र. ७४/२००७ (वि. प.मार्ग पोलीस ठाणे, वि.स्था. गु. र.क्र. ३३७४/२००७ कलम ३,२५ भाहका सह १३५ मुपोका | दोषारोप पत्र दाखल दि. १५/०५/२००८<br><br>न्यायनिर्णय दिनांक ०८/०५/२०२४<br><br>पोउनि शिंदे | १. दोन सरकारी साक्षीदारांनी जप्त मुददेमालाचे वर्णन वेगवेगळे केले असून त्यांचे जबाबत तफावत आढळते.<br>२. Cartidge वरील अक्षराचे वर्णन व FSL रिपोर्ट मध्ये तफावत.<br>३. शस्त्राच्या वर्णनाबाबत फिर्यादी साक्षीदार यांच्या विधानातील विरोधाभास<br>४. काडतूसाच्या स्वरुपातील फरकामुळे जप्त व एफएसएल येथे पाठविलेल्या शस्त्राबाबत शंका निर्माण होते.<br>५. जप्त शस्त्र व एफएसएल येथे पाठविण्यात आलेले शस्त्र वेगळे आहेत.<br>६. एफएसएल येथे ६ दिवस उशिराने शस्त्र पाठवण्यात आले.<br>७. जप्त शस्त्र एफएसएल येथे पाठवण्यास झालेल्या विलंबा बाबत तसेच त्याचे जतन करण्याकरीता कायदेशिर प्रक्रिया राबवण्यात आल्याबाबत कोणतेही विशिष्ट कारण तपासी अधिकारी यांनी दिले नाही.<br>८. अटक पंचनामा रेकॉर्डवर नाही.<br>९. proclamation order not produced on record. | निरंक | निरंक | निरंक |

(पूजा ढोक)
विधी अधिकारी

23/9/2024
( मिलिंद काठे)
पोलीस निरीक्षक,
गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक,
गुन्हे शाखा. मुंबई

(दत्ता नलावडे)
पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण)
गुन्हे शाखा. मुंबई

Scanned with CamScanner